**आता माझा माले जीव**

अरे रडता रडता
डोये भरले भरले
आसू सरले सरले
आता हुंदके उरले!

आसू सरले सरले!
माझा मालेच इसावा
असा आसवा बिगर!
रडू नको माझ्या जीवा!

सांग सांग धर्ती माता
अशी कशी जादू झाली
झाडं गेलं निंघीसनी
मांघे सावली उरली

देव गेले देवाघरी
आठी ठेयीसनी ठेवा
डोयापुढे दोन लाल
रडू नको माझ्या जीवा!

रडू नको माझ्या जीवा
तुला रड्याची रे सव
रडू हासव रे जरा
त्यात संसाराची चव!

कुकू पुसलं पुसलं
आता उरलं गोंधन
तेच देइन देइन
नाशिबले आवतन

जरी फुटल्या बांगड्या
मनगटी करतूत
तुटे मंगयसूतर
उरे गयाची शपत

नका नका आयाबाया
नका करू माझी कीव
झालं माझं समाधान
आता माझा माले जीव

**बहिणाबाई  चौधरी**